सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं/३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना/०७/२०२५, मुंबई, दि. २१/०८/२०२५

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्रमांक-बांधका -०३२५/ प्र. क्र. १८९/पोल-७, दि.२०/०८/२०२५.

**विषय :-** मौजे गोजुबाबी,ता.बारामती,जि.पुणे येथे प्रस्तावित श्वान प्रशिक्षण केंद्र, निर्मितीचा टप्पा क्र. २ मधील बांधकामाकरिता व सदर श्वान प्रशिक्षण केंद्रास पाणीपुरवठा योजना या कामाच्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्रमांक बांधका -०३२५ /प्र.क्र.१८९/पोल - ७, दि.२०/०८/ २०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०८२०१२३६२४४९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
PRAVIN MADHUKAR SHIKHARE
Date: 25-08-2025 17:18:51

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस अधिक्षक,पुणे ग्रामीण,पुणे.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**मौजे गोजुबावी, ता.बारामती, जि.पुणे येथे प्रस्तावित श्वान प्रशिक्षण केंद्र निर्मितीचा टप्पा क्र.२ मधील बांधकामाकरिता व सदर श्वान प्रशिक्षण केंद्रास पाणीपुरवठा योजना या कामाच्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्र.बांधका-०३२५/प्र.क्र.१८९/पोल-७.**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२.
दिनांक : २० ऑगस्ट, २०२५.

**संदर्भ** :- १) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन ज्ञापन क्र. बांधका-११२३/प्र.क्र. ३९१/पोल-७, दि.०२/१२/२०२३

२) अपर पोलीस महासंचालक (नि.व स.), पोलीस महासंचालक कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/२७/गोजूबावी-बारामती/श्वा.प्र.कें./अंदाजपत्रक/गु.अ.वि./ ४१६/२०१३, दि.०५.०३.२०२५

३) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, बैठक इतिवृत्त क्र.बीडीजी -२०२५/प्र.क्र.४०/इमा-१, दि.०१.०८.२०२५

**शासन निर्णय :-**

अपर पोलीस महासंचालक (नि.व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मौजे गोजुबावी, ता.बारामती, जि.पुणे येथे प्रस्तावित श्वान प्रशिक्षण केंद्र निर्मितीचा टप्पा क्र.२ मधील बांधकामाकरिता व सदर श्वान प्रशिक्षण केंद्रास पाणीपुरवठा योजना या कामांच्या रू.५९,११,६७,०९३/- (रुपये एकोण्णसाठ कोटी अकरा लाख सदुसष्ठ हजार त्र्यान्नव फक्त) इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

२. यापुर्वी मौजे गोजुबावी, ता.बारामती, जि. पुणे येथील श्वान प्रशिक्षण केंद्र उभारणी करणेकामी रु. ५६,७६,१६,४४०/- (रुपये छप्पन कोटी शहात्तर लाख सोळा हजार चारशे चाळीस फक्त) एवढ्या रकमेच्या अंदाजपत्रकास संदर्भाधिन क्र.१ अन्वये प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे.

३. आता मौजे गोजुबावी, ता.बारामती, जि.पुणे येथे प्रस्तावित श्वान प्रशिक्षण केंद्र निर्मितीचा टप्पा क्र.२ मधील बांधकामाकरिता व सदर श्वान प्रशिक्षण केंद्रास पाणीपुरवठा योजना करिता प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

४. शा.नि.क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र. ३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल २०१५, पृष्ठ क्र.६८ आणि सुधारित शा.नि.क्र. विअप्र- २०१३/प्र.क्र. ३० / १३ / विनियम (भाग-२), दिनांक २०/०९/२०१९ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग-पहिला, उप विभाग-पाच परि. क्र. १३४, अ.क्र. १ मध्ये इमारतीच्या बांधकामाच्या नकाशास व अंदाजित खर्चास (वित्तीय मान्यता धरुन) प्रशासकीय मान्यता देण्याबाबत अट क्र. ५ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारीत अट करण्यात आली आहे,

"(५.१)रू.१५ कोटी पेक्षा कमी किंमत असलेल्या अंदाजपत्रकीय रकमेच्या कामांच्या ढोबळ अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रीय स्तरावरील तांत्रिक मान्यता (Technical Sanction) प्रदान करण्यास सक्षम अधिका-याने तांत्रिक सहमती (Technical Approval) प्रदान केल्यानंतर, क्षेत्रीय स्तरावरील सर्वोच्च तांत्रिक अधिकारी असलेल्या संबंधित मुख्य अभियंता (स्थापत्य) व मुख्य अभियंता (विद्युत) यांच्याकडून शिफारशीसह प्राप्त अंदाजपत्रकानुसार उपभोक्ता विभागाने त्याच्या कडील कामाची निकड व अनुदानाच्या उपलब्धतेनुसार विहीत कार्यपद्धतीने प्रशासकीय मान्यता प्रदान करावी.

(५.२) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीमध्ये छाननी करण्यात येणा-या रू.१५ कोटी पेक्षा जास्त किंमत असलेल्या अंदाजपत्रकीय रकमेच्या कामांना मंत्रालय स्तरावरून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तांत्रिक सहमती (Technical Approval) दिल्यानंतर उपभोक्ता विभागाने त्यांच्या कडील कामाची निकड व अनुदानाच्या उपलब्धतेनुसार विहीत कार्यपद्धतीने प्रशासकीय मान्यता प्रदान करावी ".

५. त्यानुसार सदर प्रस्ताव मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीसमोर सादर करण्यात आला असून संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये समितीने मौजे गोजुबावी, ता.बारामती, जि.पुणे येथे प्रस्तावित श्वान प्रशिक्षण केंद्र निर्मितीचा टप्पा क्र.२ मधील बांधकामाकरिता व सदर श्वान प्रशिक्षण केंद्रास पाणीपुरवठा योजना या कामांकरिता रू. ३८,६७,००,०००/- (रुपये आडतीस कोटी सदुसष्ठ लाख फक्त) इतक्या किंमतीस खालील अटींच्या अधिन राहून सहमती दर्शवली आहे.(सोबत Recapitulation Sheet)

(अ) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वस्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.

(ब) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

(क) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/ तां.क.१. दि.१० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

(ड) सदर कामाच्या बांधकामाचा खर्च गृह विभागाने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नियत व्ययामधून करण्यात यावा.

(इ) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.बीडीजी २०१७/प्र.क्र.६०/इमा-२, दि.७/७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

(ई) नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुनच सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

(उ) सदर श्वान प्रशिक्षण केंद्रासाठी पाणीपुरवठा योजनेच्या रु.८,८२,२४,०००/- इतक्या रकमेबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून तपासून घेतल्यानंतरच पुढील कार्यवाही करावी.

६. वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग-पहिला, उप विभाग-पाच परि. क्र. १३४, अ.क्र. १ नुसार दिलेल्या मान्यतेनूसार मौजे गोजुबावी, ता.बारामती, जि.पुणे येथे प्रस्तावित श्वान प्रशिक्षण केंद्र निर्मितीचा टप्पा क्र.२ मधील बांधकामाकरिता व सदर श्वान प्रशिक्षण केंद्रास पाणीपुरवठा योजना या कामांकरिता रू. ३८,६७,००,०००/- (रुपये आडतीस कोटी सदुसष्ठ लाख फक्त) इतक्या खर्चाच्या कामास वरील अटीच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१२७/२०२५/ इमा-२, दि.२६/०६/२०२५ व संदर्भ क्र.३ च्या पत्राच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०८२०१२३६२४४९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHETAN BALASAHEB NIKAM

Digitally signed by CHETAN BALASAHEB NIKAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7268DE40660971F80951C66D0E657E903B378196F51A978D2A366CF5EB564C0C, cn=CHETAN BALASAHEB NIKAM
Date: 2025.08.20 12:37:38 +05'30'

**(चेतन निकम)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
३) मुख्य अभियंता, सा.बां. विभाग, पुणे.
४) पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे.
५) वित्त विभाग (व्यय/विनमय)
६) कार्यासन अधिकारी (इमा.-२), सा.बां. विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) कक्ष अधिकारी(अर्थ-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवड नस्ती (पोल-७).